सकाळ

# सातारा मॅरेथॉनमध्ये सायबर सुरक्षा जनजागृती

शेंद्रे : वर्ये (ता. सातारा) येथील कर्मवीर भाऊराव पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अ‍ॅण्ड रिसर्चतर्फे सातारा हिल मॅरेथॉनमध्ये सायबर सुरक्षा जनजागृती करण्यात आली. समन्वयक भविका मुथा, आदिती घोरपडे, अंकिता दणाणे, वैष्णवी चव्हाण यांचा त्यात सहभाग होता. इन्स्टिट्यूटचे संचालक डॉ. बी. एस. सावंत, विभाग प्रमुख डॉ. आर. डी. कुंभार, समन्वयक तेजश्री शेवते यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी सायबर सुरक्षाविषयक माहितीपत्रकाचे वाटप करण्यात आले. उपस्थितांना सुरक्षित इंटरनेट वापर, डेटा संरक्षण, सायबर फसवणुकीपासून बचाव याविषयी मार्गदर्शन केले.

Satara, Satara-Today
05/09/2024 Page No. 3